**प्रेसनोट दि.११/०८/२०१९**
**खडकी पोलीस स्टेशन, पुणे शहर**
**१,२०,००० रुपयांचे सोन्याचे दागीने दागीने मालकाचे ताब्यात दिले.**

दिनांक ०५/०८/२०१९ रोजी मधुबन सोसायटी फ्लॅट नंबर १४/३/१५ लेन नंबर १ सांगवी पुणे या ठिकाणी मुळा नदीचे पुराच्या पाणी आल्याने सदर ठिकाणाचे रहिवाशी प्रसाद कृष्णा झांजुर्णे हे त्यांची बहिण व आई वडिल यांचेसह रिक्षाने त्याचे मामाकडे लोहगांव येथे सोन्याचे दागिने, दोन मोबाईल फोन व दैंनदिनी वापरण्याचे कपडे एका बॅग मध्ये घेवून जात होते. तेव्हा त्याच्याकडून घाई गडबडीत त्यांची बॅग रिक्षात विसरली व ते लोहगांव येथे निघून गेले. त्यानंतर त्याचे मामा सदाशिव लाड यांनी त्याच दिवशी पोलीस ठाणे येथे येवून माहिती दिली होती. सदर बाबत लागलीच ज्या रोड ॲटो रिक्षा गेली त्या रोडचे सीसीटिव्ही फुटेज ची पाहणी करुन रिक्षा मालकाचा शोध घेतला त्याचे नाव विनोद पोमा चव्हाण असे असल्याचे समजल्याने त्याच्याकडे ॲटो रिक्षा मध्ये विसरलेली बॅग बाबत चौकशी करता त्याने सांगितले की, रिक्षामध्ये एक बॅग विसरलेली बॅग ही रिक्षामध्येच आहे असे म्हणून रिक्षा मध्ये विसलेली बॅग काढून दिली असता त्यामध्ये पाहणी केली असता प्रसाद कृष्णा झांजुर्णे यांचे गहाळ झालेली बॅग व त्यामधील १,२०,०००/- रुपये किमंतीचे सोन्याचे दागिने, दोन मोबाईल फोन व दैंनदिनी वापराचे कपडे मिळून आले आहे. मिळून आलेला वर नमुद मुद्देमाल खात्रीकरुन प्रसाद कृष्णा झांजुर्णे याच्या ताब्यात देण्यात आला आहे.

सदरची कामगिरी पोलीस निरीक्षक गुन्हे श्री पठाण, याच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक श्री प्रताप ल. गिरी, पोलीस हवा. १७३ ठोकळ, पोहवा. ३३०४ कदम, पोना. ३२७२ घुटे, पोना. ६८५० लोखंडे, पोना. ९४७ पवार, पोशि. ९८०६ गायकवाड , पोशि. ८८११ माने, पोशि. ८३२५ लोणकर, पोशि. १२०१२ सोनवणे यांनी मिळून केली आहे.

**( शफिल पठाण )**
पोलीस निरीक्षक (गुन्हे)
खडकी पोलीस स्टेशन, पुणे शहर.